पुण्य नगरी ▪ बुधवार, २ जुलै २०२५

# 'वायसीएमयू'चा वर्धापन दिन उत्साहात

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वर्धापन दिन विभागीय कार्यालयाच्या आवारात उत्साहात झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण, महाराष्ट्र राज्य गीत आणि विद्यापीठ गीताचे सादरीकरण करण्यात आले. न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे स्वागत वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी केले. विविध अभ्यास केंद्रांचे प्रा. विश्वास पाटील, प्रा. राजू लोहार, प्रा. शंकर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विभाग केंद्रातील कक्ष अधिकारी संजय काटे, विवेक गुल्हाने, विजयसिंह रजपूत, सविता पाटील, निकिता देसाई, अमित व्हटकर, अक्षय नाईक, धीरज लोखंडे, प्रशांत केसरकर आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २ जुलै २०२५

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये जॉब ट्रेनिंग, फिल्ड प्रोजेक्ट उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार विवेकानंद महाविद्यालयाचा बायोटेक्नॉलॉजी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बी. एस्सी. भाग ३ च्या विद्यार्थांसाठी जॉब ट्रेनिंग व फिल्ड प्रोजेक्ट हा उपक्रम घेण्यात आला. पृथ्वीराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी विविध औद्योगिक क्षेत्रामधून बाहेर पडणारे सांडपाणी, त्यावर करावी लागणारी प्रक्रिया व तपासणी यावर विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक केले. दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद कार्यालय येथे बसवण्यात आलेल्या बायोगॅस प्लांटला भेट देत, जिथे कॅन्टिन किचनमधून तयार होणाऱ्या कचऱ्यापासून बायोगॅस तयार होतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी अनुभवले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. एस. जी. कुलकर्णी व डॉ. एस. बी. मुल्ला यांचे सहकार्य लाभले.

२४